**MHRG**110012992023

<u>नियमित दिवाणी दावा क्र. ४१०/२०२३ मधील</u>
<u>निशाणी क्रमांक २१ खालील आदेश</u>

प्रस्तुतचा अर्ज हा प्रतिवादीने दिवाणी प्रक्रिया संहिता कलम आदेश ६ नियम १७ प्रमाणे कैफियतीमध्ये दुरूस्ती करण्यासाठी दाखल केला आहे.

२. प्रतिवादीने कथन केले की, त्यांच्याकडे दावा दाखल करताना पुर्ण कागदपत्रे वादीने दिलेले नव्हते. वादीने जोडलेला कच्चा हात नकाशा त्यांना प्राप्त झाला नव्हता. म्हणुन सदर हात नकाशाच्या अनुषंगाने प्रतिवादी यांना दाव्यामध्ये दुरुस्ती करायची आहे.

३. वादी यांनी अर्जास विरोध दर्शविला आहे व नमुद केले की, अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादीवर खर्च लादुन वादीला देण्यात यावा.

४. येथे नमुद करणे महत्वाचे आहे की, प्रस्तुतचा दावा हा निरंतर मनाई हुकुमाच्या आदेशाकरिता दाखल केला आहे. आज रोजी प्रतिवादीने कैफियत दाखल केली आहे. प्रस्तुतचा अर्ज मंजुर केल्यास त्याचा वादीला कोणतेही नुकसान होणार नसल्याचे दिसुन येते. तसेच प्रक्रियेची बाहूल्यता टाळण्यासाठी देखील वरील दुरुस्ती करणे महत्वाचे आहे. तसेच, प्रतिवादी यांना कैफियतीमध्ये बचाव घेण्याची व त्यांचे म्हणणे मांडण्याची संपुर्ण संधी देणे योगय व रास्त आहे. प्रतिवादीने आजच कैफियत दाखल करुन निशाणी क्र. ०५ वरील अर्जावर युक्तीवाद केला आहे. प्रतिवादीकडुन कोणताही विलंब झाल्याचे दिसुन येत नाही. म्हणुन वादीच्या विनंतीनुसार खर्चाबाबत आदेश करणे योग्य व रास्त होणार नाही. वरील सर्व कारणांचा एकत्रित विचारकरीता मी या निष्कर्षाला आलो आहे की, प्रतिवादीचा

अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

१. सदरचा अर्ज (निशाणी क्र. २१) मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादीने पुढील तारखेपर्यंत कैफियत दुरुस्ती करुन दुरुस्ती प्रत अभिलेखावर सादर करावी.

माणगांव, (जी. सी. फुलझळके)
दिनांक : २१.१२.२०२३ सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, माणगांव